ISSN-2320-4494
RNI No.MAHAUL03008/13/2012-TC
Impact Factor : 2.7286

# POWER OF KNOWLEDGE

An International Multilingual Quarterly Peer Review Refereed Research Journal

VOLUME - I ISSUE - III
OCT. TO DEC. 2020



ARTS | COMMERCE
SCIENCE | AGRICULTURE
EDUCATION | MANAGEMENT
MEDICAL | ENGINEERING & IT I LAW
PHARMACY | PHYSICAL EDUCATION
SOCIAL SCIENCE | JOURNALISM
MUSIC | LIBRARY SCIENCE |

www.powerofknowledge.co.in
E-mail : powerofknowledge3@gmail.com
Editor
Professor Dr.Sadashiv H. Sarkate

Scanned with CamScanner

RNI No. MAHAUL03008/13/1/2012-TC

# POWER OF KNOWLEDGE

**An International Multilingual Quarterly Peer Review Refereed Research Journal**

**Editor**
**Dr. Sadashiv H. Sarkate**

**• Mailing Address •**
**Dr. Sadashiv H. Sarkate**
**Editor : POWER OF KNOWLEDGE**
**Head of Dept. Marathi**
Art's & Science College, Shivajinagar, Gadhi, Tq. Georai Dist. Beed-431 143 (M.S.)
Cell. No. 9420029115 / 7875827115
Email : powerofknowledge3@gmail.com /
shsarkate@gmail.com

**Price : Rs. 300/-**
**Annual Subscription: Rs. 1000/-**

Scanned with CamScan

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या साहित्यातील मानवतावाद | डॉ.मनोहर आंबटकर<br>डॉ. मिलिंद कांबळे | 1-5 |
| 2 | विमुक्त भटक्यांच्या चळवळीला दिशा देणारे आत्मकथन: 'कत्ती' | डॉ.मारोती कसाब | 6-9 |
| 3 | कुसुमाग्रजांची राष्ट्रीय कविताः एक आस्वाद | प्रा.डॉ.विनोद उत्तमराव भालेराव | 10-15 |
| 4 | संत साहित्यातील संतकवियित्री | प्रा. डॉ. सुनंदा चरडे | 16-21 |
| 5 | राष्ट्रसंतांची 'ग्रामगीता'निर्मिती मागील भूमिका | डॉ. अविनाश श. धोबे | 22-25 |
| 6 | एकोणिसावे शतक : स्त्री व समाज | जागृती अरुण बधान | 26-29 |
| 7 | 'होळी' बंजारा समाजाचा सांस्कृतिक उत्सव | प्रा.डॉ.विनोद दे. राठोड | 30-33 |
| 8 | दलित आत्मकथनातील प्र.ई.सोनकांबळे यांचे समाजव्यवस्थेतील स्थान | प्रा.नामदेव शिनगारे | 34-37 |
| 9 | महाराष्ट्रातील दत्त संप्रदायकालीन सामाजिक स्थिती.गती : एक दृष्टीक्षेप | प्रा.डॉ.राजेंद्र सुखदेव चौधरी | 38-41 |
| 10 | आदिवासी नायकांचे स्वातंत्र्यासाठीचे योगदान | डॉ. विठ्ठल केदारी | 42-48 |
| 11 | भाषा आणि साहित्य : आंतरसंहितात्मक अभ्यास | डॉ.बालाजी घारुळे | 49-52 |
| 12 | गुलाममंडी उपन्यास में चित्रित पात्रों की समीक्षा | डॉ.बालकवि लक्ष्मण सुरंजे | 53-55 |
| 13 | इक्कीसवी सदी का मीडिया | प्रा. डॉ. बायजा कोटुळे | 56-60 |
| 14 | निराला के काव्य में राष्ट्रीय चेतना | डॉ. संतोष रामचंद्र आडे | 61-64 |
| 15 | "अल्मा कबूतरी" उपन्यास में अभिव्यक्त भाषाशैली एवं उद्देश्य | प्रीती अहिर<br>डॉ.बालकवि लक्ष्मण सुरंजे | 65-67 |
| 16 | कोरोना संकट में वैश्विक अर्थव्यवस्था और खेल उद्योग पर असर | डॉ.हेमंत वर्मा | 68-74 |
| 17 | आधुनिक हिंदी कहानियों में चित्रित वैवाहिक परिदृश्य | डॉ.ज्ञानेश्वर महाजन | 75-77 |
| 18 | सिनेमा और साहित्य | प्रा. डॉ. उत्तम जाधव | 78-80 |
| 19 | ओमप्रकाश वाल्मीकि की कविताओ मे अभिव्यक्त आंबेडकरवादी चितन | प्रा.डॉ.रविंद्र आर. खारे | 81-86 |
| 20 | समकालीन दौर में साहित्य और सिनेमा की भूमिका | प्रोफेसर डॉ.आबासाहेब राठोड | 87-91 |
| 21 | महाराष्ट्रातील जलसिंचनातील असमोल : एक दृष्टिक्षेप | प्रा.रासकर भीष्मा रंगनाथ | 92-98 |
| 22 | भारताच्या नियोजन कालखंडातील शेतीचा विकास | डॉ. मुळे पी.एम. | 99-102 |
| 23 | धुळे जिल्ह्यातील धरणप्रभावित क्षेत्रांचा सामाजिक व आर्थिक अभ्यास | संजय नामदेवराव तोरवणे<br>प्राचार्य. डॉ. डी. एस. पाटील | 103-106 |


Scanned with CamScanner

# महाराष्ट्रातील दत्त संप्रदायकालीन सामाजिक स्थिती.गती : एक दृष्टीक्षेप

प्रा.डॉ.राजेंद्र सुखदेव चौधरी
दिगंबरराव बिंदू महाविद्यालय, भोकर

मध्ययुगीन काळापासून भारतात अनेक भक्ती संप्रदायांची परंपरा सुरू झालेली असून; त्यातील काही भक्तीसंप्रदाय हे महाराष्ट्रात आले व इथल्या भूमीत स्थिर होऊन विस्तारित पावले. जसे शैव, वैष्णव, नाथपंथी, कृष्ण, दत्त, विरशैव, जैन, लिंगायत इत्यादी, अनेक भक्तीसंप्रदाय भारतातील अनेक भागात धर्माचरणाचे कार्ये करीत होते. यातूनच महाराष्ट्रामध्ये काही भक्तीसंप्रदायाची निर्मिती झाली. त्यात नाथसंप्रदाय, दत्तसंप्रदाय, विरशैव संप्रदाय यांचा प्रामुख्याने उल्लेख करता येण्यासारखा आहे. त्यात 'दत्तसंप्रदाय' हा एक प्रमुख संप्रदाय मानला जातो. यालाच 'अवधूत संप्रदाय' असेही संबोधले जाते. 'श्रीदत्तात्रेयप्रभू' हे या संप्रदायाचे आराध्य दैवत. शैव,वैष्णव व षाक्त या तीनही उपासना प्रवाहांना व्यापणारा दत्तात्रेयांचा प्रभाव सर्वश्रृत आहे. महाराष्ट्रातील महानुभाव,नाथ,वारकरी आणि समर्थ संप्रदायात दत्तात्रेयांविशयी उत्कट श्रध्द्वाभाव दिसून येतो. यासंदर्भात दत्तसंप्रदाय व तत्कालीन स्थिती. गतीबद्दल जाणून घेता येण्यासारखे आहे.

**दत्तसंप्रदाय व तत्कालीन सामाजिक स्थिती :**

मध्ययुगीन काळात हिंदु राजांचे प्राबल्य कमी होऊन मुसलमानी राजवटी स्थिर झाल्या. सनातन वैदिक धर्म पाळणाऱ्या ब्राह्मण पुरोहितांचा राजाश्रय लोप पावला. अशावेळी ब्राह्मनांनी मुसलमानी राजांची नोकरी पत्करली. त्यांच्यात कर्मभ्रष्टता आली. तेव्हा सनातन धर्माचे पुनरूज्जीवन करून स्वधर्म रक्षणासाठी खरा आचारधर्म शिकवण्याचा प्रयत्न दत्तसंप्रदायाने केला. ''हा संप्रदाय चौदाव्या शतकाच्या अखेरीस श्रीपादश्रीवल्लभ व नृसिंहसरस्वती या दोन सिध्द् पुरूषांच्या पुण्याईने उत्कर्ष पावला. 'गुरूचरित्र' हा या पंथाचा प्रमाणग्रंथ असून; त्यात मुख्यत: कर्मकांडाचेच विवरण आहे. लोकांच्या मनावरील वर्णाश्रम धर्माची पकड कायम ठेऊन,सनातन वैदिक परंपरेचे पुनरूज्जीवन करण्याची उत्कंठा या ग्रंथात दिसून येते. नृसिंह सरस्वतींची परंपरा आद्य शंकराचार्यापासूनची आहे.''[१] अर्थात योगसाधना व भक्ती यांस समान महत्व देणारा दत्त संप्रदाय हा बहामनी काळात अधिक पुढे आलेला दिसत असला; तरी त्यापूर्वी दत्तोपासना ही महाराष्ट्रात होतांना दिसते. या संप्रदायाचे प्रवर्तक 'श्रीनृसिंह सरस्वती' हे होते. कृष्ण.सरस्वती या एका वृध्द संन्यास्याकडून त्यांना धर्मदीक्षा मिळाल्यानंतर त्यांचे नरहरी हे नाव बदलून दीक्षांत नाव नृसिंह सरस्वती हे ठेवले आणि ते लोकप्रसिध्द झाले. नृसिंहानी काही काळ ज्ञानदानाचे कार्य केले. भक्तांना परमार्थाची वाट दाखविली. ते भटकंती करीत असतांना; त्यांना माधव,बाळकृष्ण,उपेंद्र,सदानंद,ज्ञानज्योती या नावाचे षिश्य लाभले. त्या सर्वांच्या नावापुढे 'सरस्वती' हे नाव लावले. सात शिष्यांसह श्रीगुरू तीर्थयात्रा करीत महाराष्ट्रातही आले. गाङ्गापूरला आले. त्यावेळी बेदरचा क्रुर व ब्रह्मव्देशी मुसलमान राजा मुत्यू पावल्यानंतर (इ.स.१४३५) त्याचा मुलगा अल्लाउद्दिन हा गादीवर बसला असे



Scanned with CamScanner

राज्यांतर घडून आले होते.

अल्लाउद्दिन हा नवीन राजा सहिष्णु आणि उदारवृत्तीचा होता. हिंदुविषयी त्याच्या मनात चांगल्या भावना होत्या. मात्र श्रीगुरूंचा आधिचा अनुभव वाईट होता. त्यासंदर्भात असे सांगता येईल की, "अहमदशहांच्या असुरी लीलांचा प्रत्यक्षानुभ श्रीगुरूंनी घेतला होता. त्यांच्या काळात महाराष्ट्रात सर्वत्र विशेषत: गोदा.कृष्णेच्या मधल्या भागात सुफींचा धर्मप्रचार वेगाने चालू होता. हेही श्रीगुरूंनी उघडया डोळयांनी पाहिले होते. त्यांचा निवास ऐकेकाळच्या सुलतानी राजधानीच्या जवळच होता. इ.स.१४३२ पर्यंत बहामनी सुलतानांची राजधानी गुलबर्ग्यास होती आणि गाङ्गापूर गुलबर्गा यातील अंतर केवळ चार योजनांचे होते. या वातावरणात श्रीगुरूंच्या जागृत विचारांचा आवेग कोणत्या दिशेने वाहत असेल; याची कल्पना करणे कठीण नाही. त्यांनी स्वत: आपल्या अनेक शिष्यांना यवनांकित भूमीत राहुनहि निर्भय जिणे जगण्याची ज्वंलत प्रेरणा दिली होती."[२] म्हणून पैशाच्या लोभाने मुसलमान राजाच्या दरबारी वेदपठण करणाऱ्या ब्राह्मण पुरोहितांची ते निर्भर्त्सना करीत. त्यातून त्यांची धर्मनिष्ठा प्रबळ होती. धर्मावर आलेले सुलतानी संकट त्यांना धार्मीक तत्वज्ञानाच्या प्रसारातूनच परतावून लावायचे होते. 'ते मुसलमानांच्या आक्रमणाचे दिवस होते. राजकीय,धार्मिक,सांस्कृतिक अशा विविध स्तरावर हे आक्रमण सुरू होते. खरे म्हणजे हिंदू धर्माचे अर्ध्वर्यू म्हणविणाऱ्या वेदविद ब्राह्मणांनी यवनांच्या आक्रमणाविरूध्द लढाऊ आघाडी उघडावयाची; लोकांत तद्नुकूल जागृती घडवून आणावयाची ते तर राहिलेच; पण हे वेदपाठी ब्राह्मण द्रव्यलोभाने म्लेंच्छ राजास शरण जात होते. महाक्रुर ब्रह्मव्देशी यवनराजा ब्राह्मणांना आपल्या सभेत वेदपठण व वेदचर्चा करावयाला बोलवी. द्रव्यलोभी,लाचार ब्राह्मण त्याच्याकडे जात. तो त्यांना टोमणे हाणी. ते त्यांना सहन करावे लागत.

"म्हणे विप्र यज्ञ करिती ।
पशुहत्या करणे रीती ।
आम्हा म्लेंच्छाते निंदिती ।
पशुवधी म्हणुनीया ।।"

म्लेंच्छ राजाचा हा ब्राह्मणांवरचा आक्षेप निरूत्तर ठरण्यासारखा नाही काय? असल्या स्वाभिमानशुन्य सत्वभ्रष्ट ब्राह्मणांचा पाठराखेपणा नृसिंह सरस्वतींनी केलेला नाही हे लक्षात घेणे आवश्यक आहे."[३] श्रीगुरूंच्या साधुत्वाची मुसलमान शासकांना जाणीव झाली होती. त्यावेळी समाजात एक नवे चैतन्य निर्माण झाले होते.

अल्लाउद्दिन दुसरा हा राजा सहिष्णु बनला होता; म्हणुन तो ब्राह्मण पुरोहितांना आपल्या दरबारात वेदपठणाला बोलवित असे; परंतु मुस्लिम धर्मगुरूंना ते अधोगतीचे लक्षण वाटायचे त्यावर राजा त्यांना म्हणायचा.

"त्याते तुम्ही निंदा करिता।
तरी सर्वाठायी परिपुर्ण म्हणतां।

प्रतिष्ठावया आपुल्या मता।
व्द्वेश आम्ही का करावा।।''[४]

अल्लाउद्दिन हा सहिष्णु असल्याने त्याचे आणि श्रीगुरूंचे संबंध प्रस्थापित झाले. तो एका फोडाच्या विकाराने त्रस्त झाला असता; त्याच्या उपचारासाठी श्रीगुरूंपुढे त्याने लोटांगण घातले आणि आपली व्यथा सांगितली. त्यावेळी श्रीगुरूंच्या अमृतदृश्टीत हा राजा निरामय झाला. तेव्हा तो श्रीगुरूंच्या चरणी लिन होऊन, त्याने श्रीगुरूंना सन्मानपुर्वक आपल्या नगरीत नेले. त्यावेळी हिंदू आणि यवन समाजात परस्पर विरोधी जे पडसात उमटले ते असे,

''लोक म्हणती म्लेंच्छयाती। पहा हो विप्रपूजा करिती।
राजा अनाचारी म्हणती। जातिधर्म सांडिला आजी।
ज्याचे पाहू नये मुख। त्याची सेवा करितो हरिखे।
राजा नश्ट म्हणोनी सकळिक। म्लेंच्छयाती बोलती।।''[५]

पुण्यश्लोक असलेल्या या राजाच्या नगरीत प्रवेश केल्यानंतर त्यांना सिंहासनावर बसवून राजा त्यांची पूजा करतो. त्याचे हृदय गुरूभक्तीने ओतप्रोत भरून जाते. श्रीगुरू त्याचा निरोप घेतात; तेव्हा त्यांच्या चरणाचा वियोग राजाला असह्य होतो. अशाप्रकारे हिंदू संत आणि मुसलमान राजा यांच्यातील सहीष्णूतेचे प्रत्यंत्तर या प्रसंगातून येते. अशा धामधुमीच्या काळात सुलतानी संकटांनी भयभीत झालेल्या हिंदू समाजजीवनात श्रीगुरूंनी आपल्या राज्यात महापातके घडतात असे यवन राजाला सांगितले होते. तो यवन राजा म्हणजे बेदरचा 'अल्लाउद्दिन दुसरा' हा श्रीगुरूंच्या चरणी लिन व्हावा; ही विशेष बाब मानावी लागते. कारण ते सर्व जाती धर्माच्या लोकांना जवळ करीत असत. श्रीगुरूंनंतर जनार्दनस्वामी,एकनाथ आणि दासोपंत यांनी श्रीगुरूंची सांप्रदायिक परंपरा पुढे सुरू ठेवली. याचबरोबर दत्तोपासनेत अनेक षिश्य परंपरा निर्माण झाली. या शिष्यांमध्ये काहींचे जीवन उन्मुक्त चिंतनाने भारून गेले होते. तर विधीनिषेधातील वृत्ती, विधी—विधानांचा व्यापक प्रपंच, आचारधर्म व उपासनातंत्र अशा वेगवेगळया घटकांना दत्तोपासक महत्व देत असत. जनार्दनस्वामी हे अहमदनगरच्या निजामशाहीत दौलताबादच्या किल्ल्यावर अधिकारी होते. त्यांच्या साधुत्वाचा प्रभाव हिंदु आणि मुस्लिम दोघांवरही होता; परंतु ''जनार्दनस्वामी हे जसे परमार्थवीर होते तसेच रणविरही होते. एकदा किल्यावर शत्रूचे आक्रमण झाले असता; ते परतवून लावण्यासाठी जनार्दन स्वामींना बोलविण्यात आले होते. त्यावेळी ते ध्यानस्थ असल्यामुळे एकनाथच त्यांच्या ऐवजी तलवार गाजवून आणि रणात यश मिळवून आले. जनार्दनस्वामी हे प्रसंगविशेशी रणांगणावर जाऊन युध्दात सहभागी होत असत; असे या प्रसंगावरून अनुमान काढणे शक्य आहे.''[६] म्हणजेच राजकीय स्वाऱ्यांची जाणीव यावरून होते. ते मुसलमान राजाकडे चाकरीस असले; तरी राजकीय स्वातंत्र्याचा विचार त्यांच्या मनात असावा असे वाटते. कारण,

''जालो परधर्मी रत । अधर्म करिता वाटे हित ।
जन्ममरणाची खंत । कैसी आता वाटेल ।

सोडूनिया मी स्वधर्म। आचरलो निच कर्म।
सेवा केली हीच ख्याती। द्रव्यलोभे यातायाती।।''७

पैशाच्या लोभापायी परधर्मीयांची नोकरी करण्याबद्दलची खंत जनार्दनस्वामी बाळगतात आणि स्वधर्माविषयी मात्र त्यांच्या मनात नितांत प्रेम दिसते. म्हणून सुलतानी संकटाला तडजोड करण्याची मानसिकता त्यांची दिसून येते.

दासोपंतांचे वडील दिगंबरपंत देशपांडे हे बेदरच्या राजाकडे अंदाजे १५६२ मध्ये चाकरीस होते. सारा वसुलीचे काम त्यांच्याकडे होते. पण दुष्काळ पडला असता; त्यावेळी ते राजाकडे सारा भरू शकले नाहीत. म्हणून त्यांना राजाकडून विचारणी झाली आणि त्रासही झाला. कारण साऱ्याची रक्कम भरली नाही; तर त्यांच्या मुलाला मुसलमान धर्माची दीक्षा देण्याची धमकी राजाने दिली होती. म्हणूनच या कारणास्तव बादशहाने त्यांच्या मुलास आपल्या ताब्यात ठेवून घेतले होते. दासोपंतांचे देखणे रूप पाहून त्याला आपल्या धर्मात आणून; आपला उत्तराधिकारी म्हणून राजगादीवर बसवावे; असे निपुत्रीक मुसलमान राजाला वाटले होते. धर्मांत्तराची वेळ जवळ येतांना मात्र दासोपंतांने दत्तात्रेयांचा धावा केला. त्यावेळी 'दत्तात्रेय' प्रकट होऊन त्या राजाला हुंडया आणि द्रव्यराशी देतो असे सांगितले जाते. तेव्हा दासोपंत राजाच्या तावडीतून सुटला. हा वृत्तांत दासोपंतांनी घरी सांगितला. नंतर दासोपंतांने दत्तात्रेयालाच आपले स्वर्वस्व मानले. अशा प्रकारे ते दत्तोपासक बैरागी बनले. अशी माहिती मिळत असली तरी मुसलमान राजवटीतील सारा पध्दत आणि धर्मांत्तराची भावना या ठिकाणी वाचकांच्या प्रत्ययास येते आणि हिंदू लोक त्यांच्या चाकरीस असल्याचे स्पश्ट होते. दासोपंतांनी नंतर वेदांन्त ग्रंथावर टिका करून मराठीत धर्मग्रंथाचे रूपांतर केले आणि लोकांना उपदेश केला. हे तत्कालीक सुलतानी संकटाला अप्रत्यक्षपणे प्रत्युत्तर होते.

अशाप्रकारे दत्तसंप्रदाय हा सर्व धर्मांना घेऊन चालणारा संप्रदाय असून मुस्लिमांच्या आक्रमणामुळे सांस्कृतिक संघर्ष उद्भवला असला; तरी आपल्या स्वधर्माला उजाळा देत परधर्मालाही सोबत घेऊन चालणारा असा हा संप्रदाय आहे. दासोपंतानंतर मुक्तेश्वर, निरंजनरघुनाथ, माणिकप्रभु, अक्कलकोटकर स्वामी, वासुदेवानंद सरस्वती इत्यादी महापुरूषांनी या संप्रदायाची परंपरा पुढे चालु ठेवली. आजही महाराष्ट्रात अनेक दत्तोपासक भक्त आढळून येतात. यातूनच महाराष्ट्रात दत्तसंप्रदाय व तत्कालीन स्थिती.गतीचे दर्शन घडतांना दिसून येते असे म्हणता येईल.

**संदर्भ ग्रंथ.**

१. संत वाङ्मय फलश्रृती : गं.भा.सरदार, पृ. १३२
२. दत्त संप्रदायाचा इतिहास : रा.चिं. ढेरे, प्र.दा.रानडे, पृ. १०४
३. प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास : खंड.चौथा : अ.ना.देशपांडे, स.कृ.पाध्ये, पृ.१५
४. दत्त संप्रदायाचा इतिहास : उ.नि.पृ.१०५
५. तत्रैव : पृ.१०७
६. प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास : उ.नि. पृ. २४
७. तत्रैव : पृ. २४

◆◆◆



Scanned with CamScanner